क्र. ११८ पहिले वर्ष

०४ डिसेंबर २०२२

# रविवारची उपासना

## आगमनकाळातील दुसरा रविवार

### प्रस्तावना

आगमनकाळाचा दुसरा रविवार. आजच्या शुभवर्तमानात बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाची आगमन काळातील प्रतिमा व त्याचं बाह्यस्वरूप ह्याचं सुंदर वर्णन आपण ऐकणार आहोत. योहानाचे एकच ध्येय, एकच विचार आणि एकच आकांक्षा होती की, परमेश्वराचा मार्ग सिध्द करा. त्याच्या वाटा नीट करा. पश्चात्ताप करा आणि देवाकडे वळा. योहानाच्या संदेशाप्रमाणे आपल्या जीवनात परिवर्तन करून परमेश्वराचा आशीर्वाद मिळवण्यास आपण पात्र ठरावेत म्हणून ह्या पवित्र मिस्साबलीत प्रार्थना करू या.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करू या**

हे सर्वसमर्थ व दयावंत परमेश्वरा, ख्रिस्ताच्या स्वागतासाठी आम्हांला सिध्द कर. त्याच्या स्वागताआड येणाऱ्या सर्व गोष्टी दूर कर. ख्रिस्त जेव्हा आपल्या वैभवाने पुन्हा येईल तेव्हा त्याच्या ज्ञानात सहभागी होण्यास व त्याच्याशी एकरूप होण्यास आम्हांला पात्र कर. तो तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात एकच परमेश्वर असून सर्वकाळ जिवंत राहतो व राज्य करतो.

### पहिले वाचन

**यशयाच्या पुस्तकातून घेतलेले वाचन**

**११:१-१०**

**"तो दुबळ्यांचा न्याय योग्यप्रकारे करील."**

इशायाच्या बुंधाला धुमारा फुटेल. त्याच्या मुळातून फुटलेली शाखा फळ देईल. परमेश्वराचा आत्मा, सुज्ञानाचा आणि समंजसपणाचा आत्मा, सुसंकल्पाचा आणि सामर्थ्याचा आत्मा, परमेश्वराच्या ज्ञानाचा आणि भयाचा आत्मा त्याच्यावर राहील. परमेश्वराचे भय धरण्यात त्याला आनंद वाटेल. तो डोळ्यांनी पाहील तेवढ्यावरून न्याय करणार नाही. कानांनी ऐकेल तेवढ्यावरूनच तो निर्णय देणार नाह, तर तो दुबळ्यांचा न्याय यथार्थतेने करील. पृथ्वीवरील दीनांच्या वादाचा यथार्थ निर्णय देईल. तो आपल्या मुखरूप नेत्राने पृथ्वीचे तारण करील. आपल्या मुखाच्या फुंकराने दुर्जनांचा संहार करील. धार्मिकता त्याचे वेष्टन आणि सत्यता त्याचा कमरबंद होईल.

लांडगा कोकराजवळ राहील. चित्ता करडाजवळ बसेल. वासरू, तरुण सिंह आणि पुष्ट बैल एकत्र राहतील. लहान मूल त्यांना हाकील. गाय आरि अस्वल एकत्र चरतील. त्यांचे बच्चे एकत्र बसतील. सिंह बैलाप्रमाणे कडबा खाईल. तान्हे बाळ नागाच्या बिळाजवळ खेळेल. थानतुटे मूल फुरशाच्या बुबुळाला हात लावील. माझ्या पवित्र डोंगरातवर ती कुठेही उपद्रव देणार नाहीत किंवा नासधूस करणार नाहीत कारण सागर जसा जलपूर्ण आहे तशी पृथ्वी परमेश्वराच्या ज्ञानाने परिपूर्ण होईल.

त्या समयी असे होईल की, राष्ट्रांकरिता ध्वजवत् उभारलेल्या इशायाच्या धुमाऱ्याला राष्ट्रे शरण येतील. त्याचे निवासस्थान गौरवयुक्त होईल.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

**स्तोत्र** ७१:१-२, ७-८, १२-१३,१७

प्रतिसाद : **"त्याच्या कारकीर्दीत न्यायीपणाला बहर येईल."**

१. हे प्रभो, राजाला आपल्या न्यायनीतीचे
वरदान दे. या राजपुत्राला आपली
न्यायपरायणता दे, म्हणजे तो तुझ्या प्रजेचा
योग्यरितीने न्यायनिवाडा करील, तुझ्या
गरीब प्रजेला न्याय देईल. (प्र.)

२. त्याच्या कारकीर्दीत न्यायीपणाला बहर
येईल आणि चंद्र लोप पावेपर्यंत सर्वत्र शांती
नांदेल. एका समुद्रापासून दुसऱ्या
समुद्रापर्यंत, युफ्राटीस नदीपासून पृथ्वीच्या
सीमेपर्यंत, त्याचे साम्राज्य पसरेल. (प्र.)

३. त्याचा धावा करणाऱ्या गरीबाला तसेच
गरजवंत आणि असहाय्य लोकांनादेखील
तो सोडवील. गरीब आणि गरजवंत
ह्यांच्यावर तो दया करील. गरजवंतांच्या
जिवांचे तो रक्षण करील. (प्र.)

४. त्याचे नाव चिरंजीव होवो. सूर्यासारखे
अनंत टिको. त्याच्या नावाने लोक
आपणांस धन्य म्हणोत. सर्व राष्ट्रे त्याच्या
नावाला धन्यवाद देवोत. (प्र.)

### दुसरे वाचन

**संत पौलने रोमकरांस लिहिलेल्या पत्रातून घेतलेले वाचन १५:४-९**

**"येशू सर्व मानवांचे तारण करतो."**

बंधुजनहो, धीराच्या आणि शास्त्रापासून मिळणाऱ्या उत्तेजनाच्या योगे आपण आशा धरावी म्हणून जे काही शास्त्रात पूर्वी लिहिले ते सर्व आपल्या शिक्षणाकरिता लिहिले. आता तुम्ही एकमताने आणि एकमुखाने आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचा जो पिता आणि देव त्याचा गौरव करावा म्हणून धीर आणि उत्तेजन देणारा देव असे करो की, ख्रिस्त येशूप्रमाणे तुम्ही परस्पर एकचित्त व्हावे.

म्हणून देवाच्या गौरवाकरिता ख्रिस्ताने तुमचाआमचा स्वीकार केला तसा तुम्हीही एकमेकांचा स्वीकार करा. कारण मी असे म्हणतो की, देवाच्या सत्याकरिता ख्रिस्त सुंता झालेल्या लोकांचा सेवक झाला; अशासाठी की, पूर्वजांना दिलेली अभिवचने त्याने निश्चित करावी आणि परराष्ट्रीयांनी त्याच्या दयेमुळे देवाचा गौरव करावा. शास्त्रात असे लिहिले आहे की, म्हणून परराष्ट्रीयांमध्ये मी तुझे स्तवन करीन आणि तुझ्या नावाचे स्तोत्र गाईन.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**लूक ४:१८**

**आलेलुया, आलेलुया!**
परमेश्वराचा मार्ग तयार करा,
त्याच्या वाटा नीट करा.
सर्व माणसे देवाने केलेले तारण पाहतील.
**आलेलुया!**

## शुभवर्तमान

**संत मत्तयच्या शुभवर्तमानातून घेतलेले वाचन ३:१-१२**

**''पापांबद्दल पश्चात्ताप करा, कारण स्वर्गराज्य जवळ आले आहे.''**

त्या काळी बाप्तिस्मा करणारा योहान उदयास आला आणि यहुदीयाच्या रानावनात उपदेश करू लागला, पापांबद्दल पश्चात्ताप करा, कारण स्वर्गराज्य जवळ आले आहे. ज्याच्याविषयी प्रवक्ता यशया बोलला होता तो हाच. तो म्हणाला होता, रानावनांत कुणीतरी घोषणा करीत आहे :

प्रभूचा मार्ग सिध्द करा.

त्याच्यासाठी सरळ मार्ग तयार करा.

योहान उंटाच्या केसाचे कपडे घाली. त्याच्या कमरेला चामड्याचा पट्टा असे. रानमध आणि टोळ यावर तो निर्वाह करी. सारा यहुदीया आणि यार्देन नदीच्या आसपासचा प्रदेश यांतले लोक त्याच्याकडे लोटू लागले. ते आपली पापे पदरी घेत आणि त्याच्याकरवी यार्देन नदीत बाप्तिस्मा घेत.

''परंतु अनेक परूशी आणि सदुकी बाप्तिस्मा घेण्याकरिता आपल्याकडे येत असलेले पाहून योहान त्यांना म्हणाला, ''अहो सर्पाच्या पिलांनो, देवाचा कोप होणार तेव्हा त्यातून तुमची सुटका होईल असे तुम्हाला कुणी सांगितले? तुम्ही आपल्या पातकांचा त्याग केला आहे असेआपल्या करणीने सिध्द करा.'' आब्राहाम आमचा पूर्वज आहे, असे म्हणायचा विचार करू नका. मी सांगतो की, अब्राहामासाठी देव या दगडातून संतती निर्माण करू शकेल. वृक्षाच्या मुळावर आता कुऱ्हाड रोखलेली आहे. चांगले फळ न देणारे एकूण एक झाड तोडून अग्नीत टाकले जाईल. तुम्ही पश्चात्ताप केला आहे हे दर्शविण्यासाठी मी तुमचा बाप्तिस्मा पाण्याने करतो. पण माझ्यानंतर येणारा माझ्यापेक्षा श्रेष्ठ आहे. त्याची पादत्राणे वाहून न्यायची माझी लायकी नाही. तो पवित्र आत्म्याने आणि अग्नीने तुमचा बाप्तिस्मा करील. खळ्यावरले धान्य पाखडून गहू आपल्या कोठारात साठविण्याकरिता तो सूप घेऊन तयार आहे. पण भूसा मात्र तो न विझणाऱ्या अग्नीने जाळून टाकील.''

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रास्ताविक**

माझ्या बंधुभगिनींनो, प्रभू येशू ख्रिस्ताच्या आगमनाची आम्ही तयारी करीत आहोत. त्याच्या दयेची आपण कळकळीने याचना करू या. दीन जनांना सुवार्ता घोषित करण्यासाठी आणि पश्चात्तापी पाप्याला बरे करण्यासाठी तो या जगात आला. आजच्या जगात त्याने पुन्हा यावे आणि सर्व गरजवंतांना मुक्तिदान द्यावे म्हणून आपण त्याच्याकडे प्रार्थना करू या.

**प्रतिसाद :** हे प्रभो, तुझे स्वागत करण्यास आमचे अंत:करण शुध्द ठेव.

१. पोप, बिशप्स, फादर्स, सिस्टर्स ह्यांनी आपणास पश्चात्तापी अंत:करणाने परिवर्तन घडवून आणण्यास मार्गदर्शन करावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. ख्रिस्ताचा गौरवमय प्रकाश आपल्या अंत:करणात यावा व त्याचा आपण आनंदाने स्वीकार करावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. ख्रिस्ताचे स्वागत आपल्या हृदयात होण्यासाठी आपण रोज बायबल चिंतन व प्रार्थना करावी. प्रभूसाठी आपली हृदये दैवी कृपेने शुध्द व्हावी म्हणून प्रार्थना करू या.

४. मरीयेने ख्रिस्ताला या जगात जन्म देण्यासाठी विश्वासाने देवाच्या हाकेला प्रतिसाद दिला, तीच श्रध्दा आपल्या हृदयात वाढावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आता आपण थोडावेळ शांत राहून वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

## समारोप

हे सर्वसमर्थ आणि नित्यजिवी परमेश्वरा, तुझ्यापासून कोणीही दूर जाऊ नये आणि सर्वांनी आपले तारण प्राप्त करून घ्यावे अशी तुझी मानवजातीकडून अपेक्षा आहे. तुझ्या लोकांच्या प्रार्थना ऐक. तुझ्या शांतीने तू जगाला मार्गदर्शन कर आणि मन:स्वास्थ्य व आनंद यांद्वारे तुझ्या ख्रिस्तसभेला तुझी सेवा करू दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, तुझ्यामुळेच आमचे अस्तित्व टिकून आहे. तुझ्या ह्या दयाळूपणामुळेच आम्ही आमच्या प्रार्थना व ही दाने तुला अर्पण करीत आहोत. त्यांचा स्वीकार कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे परमेश्वर बापा, तू आम्हांला स्वर्गातून भाकर दिली आहेस. ह्या स्वर्गीय भाकरीमुळे सद्बुध्दीने चालण्यास व स्वर्गीय गोष्टींची आवड धरण्यास आम्हांला शक्ती मिळो. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

## चिंतन

आगमनकाळातील पहिल्या भागात प्रभूच्या पुनरागमनाची तयारी करीत असताना आजची वाचने तीन विचार आपल्यासमोर सादर करतात:

**अ) मूळ वैभवाकडे परतणे :** पहिले वाचन (यशया ११:१-१०) इशायाचा बुंधा याविषयीचे भाकीत वर्णन करतो. झाड कापल्यानंतर बुंधा मागे उरतो त्याप्रमाणे बाबिलोनने जेरूसलेम उद्ध्वस्त केल्यानंतर लोकांना हद्दपार केले. मात्र तिथूनही परमेश्वर थोड्याशा उरलेल्या लोकांमधून पुन्हा एकदा भावी मसिहाचे राज्य निर्माण करण्यास समर्थ आहे (इशायाच्या बुंध्याला धुमारा फुटेल) असे यशया सुचविते. आगमनकाळात माणसाने आपल्या मूळ वैभवाकडे परतावे अशी अपेक्षा आहे.

**ब) दुसऱ्याचा स्वीकार करणे :** आजच्या दुसऱ्या वाचनात (रोम १५:४-९) संत पौल रोमकरांस आठवण करून देतो की जसा परमेश्वराने त्यांचा स्वीकार केला तसा त्यांनीही परराष्ट्रीयांचा स्वीकार करावा.

**क) ईश्वरी न्यायाची जाणीव ठेवणे :** आजच्या शुभवर्तमानात (मत्तय ३:१-१२) वापरण्यात आलेले अग्नीचे प्रतीक हे येशू 'जिवंत आणि मृतांचा न्याय करावयास पुन्हा येणार आहे ह्याचे स्मरण करून देते.

**आत्मपरीक्षण :** आपल्या शेजाऱ्याचा मोकळ्या मनाने स्वीकार करून आपल्या मूळ वैभवाकडे परतण्यासाठी आपण काय करायला हवे?

●●●

| डिसेंबर २०२२ | दैनंदिन बायबल वाचने — दुसरा सप्ताह |
|---|---|
| सोम ०५ धन्य फिलिप रिनाल्डी (जां) | : यशया ३५:१-१०/लूक ५:१७-२६ |
| मंगळ ०६ सं. निकोलस (पां) | : यशया ४०:१-११/मत्तय १८:१२-१४ |
| बुध ०७ सं अंब्रोज (पां) | : यशया ४०:२५-३१/मत्तय ११:२८-३० |
| गुरु ०८ प. म. निष्कलंक गर्भसंभव (पां) | : उत्पत्ती ३:९-१५,२०; इफिस १:३-१२/लूक १:२६-३८ |
| शुक्र ०९ सं जुआन दियेगो (जां) | : यशया ४८:१७-१९/मत्तय ११:१६-१९ |
| शनि १० लोरेटोची मरिया. मा.(जां) | : सीराक ४८:१-११/ मत्तय १७:१०-१३ |